साहित्य प्रतिष्ठान

अंकुर अक्षरांचे

भाग पाचवा

मनातल्या भावनांना अंकुर फुटावेत
अन त्या अंकुराची अक्षरं उमटावीत
अक्षरांचे श्वास होता होता
अंकुरल्या भावनांना पान फुटावीत..
अंकुर पानावर उमटावी एक कळी प्रतिमेची
हुंकार भरता तिची असंख्य फुले व्हावीत
फुलारलेलं ओंजळीत एक रोपटं
अस्तित्वाची नवी जाणीव मिळवी
जाणिवा पसरत जाव्या धुपासारख्या अशा
आयुष्याची कस्तुरी अंकुरातून दरवळावी

मराठी कविता

ई-पुस्तकाचे नाव: अंकुर अक्षरांचे (भाग पाचवा)

संकल्पना: मराठी कविता फेसबुक

रसग्रहण: रंजन कंधारकर (औरंगाबाद)

आशीर्वाद: फ.मु. शिंदे सर

मुखपृष्ठ: अमृता ढगे (मुंबई)

मांडणी व सजावट: संहिता हिस्वनकर

©या पुस्तकातील कवितांचे सर्व हक्क त्या त्या कवींच्या स्वाधीन. या पुस्तकातील कुठल्याही कवितेचा वापर अथवा पुनर्मुद्रण करण्याआधी संबंधीत कवीची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

संपर्क

ईमेल akshar.ankurmk1@gmail.com, esahity@gmail.com

वेबसाईट http://www.esahity.com/

फेसबुक http://www.facebook.com/groups/kavya.marathi

मराठी कविता

मक: आमच्या मनातल्या
अक्षरांचे अंकुर.

मक ही एक जागा आहे, जिथं मन मोकळं करता येतं, जिथं मनात येईल ते शब्दात मांडता येतं, लिहिता येतं... मक ही एक जागा आहे जिथं अनेक लोक भेटतात. अनेक नाती बनतात, अनेक परिवार जोडले जातात... अक्षरं जुळवली जातात आणि "माणूस" घडत जातो.. आपल्यातल्या पत्येकासाठी आपली अशी एक जागा नक्की असते जिथं बस आपण "आपण" राहू शकतो आणि माणूस म्हणून घडू शकतो.

मराठी माणसाचं मराठीपण जपताना, एक नवं व्यासपीठ उभं करताना आपण मक च्या रुपाने सेतूतल्या खारीचा वाटा उचलतो आहोत ही भावना लाखमोलाची आहे, "मराठी कविता" सोबत एक पूर्णतया लेखकांवर केंद्रित उपक्रम असण्याची गरज आम्हाला जाणवत होती. ई-साहित्य प्रतिष्ठान च्या कार्यामध्ये अमूल्य शुभेच्छा देणारे अनेक लोक आम्हाला भेटतात. अनेक अनेक लोक असेही असतात ज्यांना स्वतः काही लिहिण्याची इच्छा असते पण त्यासाठी नेमकं काय करावं हे माहीत नसतं. आणि याच वर्गामध्ये अनेक हीरे लपलेले असतात. त्यांना शोधून काढण्याचा हा एक छोटासा प्रयत्न होता. मक चे प्रयत्न इथे थांबणार नाहीत. आणि असेच अनेक उपक्रम भविष्यात होतील.. मराठी भाषेला डिजिटल जगात पुढे नेण्यासाठी हे गरजेचं आहेच.

अक्षर अंकुर महोत्सव २०१२ उभा करताना अनेक अनेक लोकांचं मार्गदर्शन लाभलं. रंजनताईंची मेहनत आणि फ. मु. शिंदे सरांचे आशीर्वाद त्यात अग्रस्थानी. ई-साहित्य प्रतिष्ठान ची संपूर्ण टीम अगदी पहिल्यापासून मक च्या मागे उभी राहिली. ई-पुस्तकं बनवण्याचा अगदी काहीही अनुभव मला नसतानाही त्यांनी सगळ्यांनी माझ्यावर विश्वास ठेवला आणि पूर्ण साथही दिली.

नाम गुम जायेगा! त्यांच्या सहभागाशिवाय हे पूर्ण होणं शक्य नव्हतंच आम्ही मक वाली मंडळी इथे थांबणार नाही.. आम्ही पुढेच जाणार आणि ई-साहित्य च्या प्रत्येक वाचकाचा आमच्या प्रवासात अत्यंत मोलाचा सहभाग असेल.

संहिता हिस्वनकर
सह-संचालिका "मराठी कविता" फ़ेसबुक

मराठी. बारा कोटी लोकांची भाषा. जगात लोकसंख्येच्या दृष्टीने पहिल्या दहा भाषांपैकी एक.

मराठी. २३०० वर्षांपुर्वीची भाषा. आज जिवंत असलेल्या सर्वात जुन्या दहा भाषांपैकी एक.

मराठी. तुकाराम ज्ञानेश्वरांपासून ते पुलंपर्यंत एकाहून एक प्रतिभावानांची भाषा.

पण.
आज या भाषेत नांव घेण्यासारखे किती तरूण लेखक कवी आहेत? त्यांना किती प्रसिद्धी मिळते? लोकांपर्यंत त्यांचं साहित्य पोचतं का? चांगल्या लेखकांना लोकांपर्यंत पोहोचवण्याचं कार्य किती प्रकाशक करतात. त्यांची पुस्तकं लोक घेतात का? की त्यांचं नांव माहित नसल्याने त्यांची पुस्तकं कोणी घेत नाहीत. आणि त्यांची पुस्तकं कोणी घेत नाहीत म्हणून प्रकाशक ती छापत नाहीत. आणि प्रकाशक ती छापत नाहीत म्हणून नवीन लेखकांची ओळख लोकांना होत नाही? या चक्रात आता मराठी अडकली आहे. नवीन प्रतिभेचे अंकुर या दुष्काळात जळताहेत. या अंकुरांना गरज आहे वाचकांच्या प्रतिसादांची.
फ़ेसबुक मक ने हे काम हाती घेतलं आणि "अक्षर अंकुर" घडवलं. कोणत्याही आर्थिक फ़ायद्याचं आमिष नसता जवळपास ३०० कवितांचा भरघोस पाठिंबा या कार्यक्रमाला मिळाला.
या कार्यक्रमासाठी कवी फ़ मुं शिंदे यांचे आशिर्वाद आणि मार्गदर्शन लाभले. त्यांचे शतशः आभार.
रंजनताई आपल्याच. जरी साहित्यिक वर्तुळात त्यांचं नांव वजनदार असलं तरी आपल्या फ़ेसबुकवर त्या आपल्यातल्याच बनून मिळून मिसळून असतात. त्यामुळे त्यांचे आभार मानायचं धारिष्ट्य मी करणार नाही. पण त्यांनी घेतलेल्या मेहनतीवाचून हे काम पुढे जाणं अशक्य होतं.

संहिताच्या पुढाकाराने हा कार्यक्रम इतका यशस्वी झाला. हा अंकुर आता रुजला. त्याचं रोपटं, त्याचं झाड, त्याचा वृक्ष आणि मग त्याची पानं, फ़ुलं, फ़ळं, सावली ओघाने येतीलच. मराठीत वर वर्णन केलेली परिस्थिती जितक्या झपाट्याने आली तितक्याच समर्थपणे तिला परतवून लावूया आणि एक वैभवशाली भाषा म्हणून तिला जगात गौरवलं जाताना पाहूया. आणि गर्वानं म्हणूया

मराठी. बारा कोटी लोकांची भाषा. जगात लोकसंख्येच्या दृष्टीने पहिल्या दहा भाषांपैकी एक.

मराठी. २३०० वर्षांपुर्वीची भाषा. आज जिवंत असलेल्या सर्वात जुन्या दहा भाषांपैकी एक.

मराठी. तुकाराम ज्ञानेश्वरांपासून ते पुलंपर्यंत एकाहून एक प्रतिभावानांची भाषा.

तसंच

मराठी : उद्याच्या सर्वोत्कृष्ट साहित्याची भाषा.

नाम गुम जायेगा
सह-संचालक "मराठी कविता" फ़ेसबुक

माणसाच्या मूलभूत गरजा तीन. अन्न, वस्त्र, निवारा.
शाळेत असताना असंख्य मास्तरांनी आणि बाईंनी आपल्याला शिकवलं.
म्हणजे इतकंच हवं असतं माणसाला जगण्यासाठी. आणि याच ३ गरजांभोवती माणूस फ़िरतो दिवसभर.
आणि या गरजा भागल्या की मग उरलेल्या वेळात काहीतरी केलं पाहीजे म्हणून माणूस काहीतरी करतो.
आता वरच्या गरजांशी निगडीत खाणे, नेसणे, राहणे ही क्रियापदे वगळली तर इतर सर्व क्रियापदांना तुम्ही
°काहीतरी° अंतर्गत समाविष्ट करू शकता.

परंतू हे काहीतरी केलंच पाहीजे असं बंधन नसताना ते काहीतरी जेंव्हा नित्य-नेमाने केलं जातं तेंव्हा
त्या °काहीतरी° चा अंतर्भाव मुलभूत गरजांच्या यादीत होऊन जातो.

व्यक्त होणं ही सुद्धा अशीच एक मुलभूत गरज आहे. प्रेशर कुकरची ती शिट्टी आहे. मनातलं प्रेशर(भावनिक) जेंव्हा
वाढत जातं तेंव्हा व्यक्त होण्याने एक दिलासा मिळतो. प्रत्येकाचे व्यक्त होण्याचे प्रकार वेगळे असतात माध्यमं वेगळी असतात.
कविता हे असेच एक माध्यम.
°अक्षर-अंकुर° या उपक्रमाने अशा व्यक्त होण्याला एक माध्यम उपलब्ध करून दिले. अनेक कविंना लिहीण्यासाठी प्रोत्साहन दिले.
इतकेच नव्हे तर त्यांच्या प्रयत्नांना लाखो वाचकांपर्यंत पोहचवले.
उद्याचे °महान° कवि °अक्षर अंकूर° चे आजचे सभासदच असतील असा दावा आम्ही करणार नाही. परंतू हा दावा आम्ही नक्की करू की
आजचा अक्षर-अंकुर चा सभासद उद्याही व्यक्त व्हायला अडखळणार नाही, बिचकणार नाही.

आनंद माने
सह-संचालक °मराठी कविता° फ़ेसबुक

रसग्रहण आणि आशीर्वाद

(रसग्राहिका रंजन कंधारकर यांच्याकडून खास काही शब्द, आमच्या उत्सवमूर्तींसाठी)

"महोत्सव अंकुरण्याचा"

सतीच्या कहाणीचं बीज मनात रुजवून, कवितेची क्रांती घेऊन क्रांती आली, आणि काय?
सुजाला काळोखातला किरण दिसला. तो जपायच्या संकल्प तिनं दृढ केला. ह्या दृढतेला अंबरीषनी हि-याचं मोल दिलं. संकल्प अधिकच दृढ झाला! माफीनामा लिहित अमोलच्या प्रवासाने वेग घेतला, तर निर्मितीच्या ध्यास लागून प्राजक्ता नभ जिंकायला निघाली. मनिषाचा वटवृक्ष वठण वाटेला असलेल्या वेदनेच्या गावात जाऊन वेदनेला अक्षरात बांधून गेला! सुनितानं अडगळीत अभिव्यक्तीची ओढ शोधली. आणि मुकुंदासाठी त्याची कविता गीत होऊन आली आणि अतीतातून मागे उरायच्या भरवसा देऊन गेली. किंचितच कवी असलेली मनीषा पंढरपूरच्या विठोबाचं आणि भक्तांचं अद्वैत सांगत स्वतःही त्यात एकरूप झाली. शाळेच्या वयापासून, कवितेला आपली म्हणणारा रुपेश, 'एक अजून रात्र सरली', इथे रोज घडे आमच्या मरणाच्या सोहळा' असं कवितेतून म्हणण्याइतका मोठा होऊन गेला.!

ही मंडळी आज माझ्या सोबत आहेत. ह्या पेक्षा सुंदर आयुष्यकण दुसरे काय असणार?
ह्यांची कविता ह्यांच्यापासून कधी ही वेगळी न होवो. ह्या साठी माझ्याकडून देवाजवळ रोज सांजवात!!

अर्जुन.

24/04/2012

आशीर्वाद......

महोत्सव हा तसा मोसमीचाच शब्द आहे. अक्षरांना अंकुरणारं आकाश असेल तर महोत्सव चंद्र पावतो. कवींचं आकाश चंद्राचं; कळांचं आणि पुन्हा पुनवेचंही. म्हणून महोत्सव आकाश आणि मातीच्या पुनवाचा चंद्रोत्सवही असतो. 'अक्षर अंकुर महोत्सव २०१२' या उपक्रमात त्याची क्रमिकताही आहेच. मुख्य म्हणजे महोत्सवातली उत्कटता.

'अंकुर अक्षरांचे' ही पुस्तक मालिका त्याची म्हणजे महोत्सवाची ई-अभिव्यक्ती आहे. 'ई' हा 'आ' चा प्रत्यय झाला की 'आई' त 'आकाश आणि 'ईश्वर' हा शब्दांचेही अर्थ पावतो. मराठी कविता संचालक मंडळाने अक्षरांस अंकुरित करण्याचा आत्मविश्वास दिला हेच मालिकेचं मोल आहे!

[illegible]

उत्सवमूर्तींच्या लेखणीतून.....

(अक्षर-अंकुर महोत्सव २०१२ तील सर्वोत्कृष्ट सहभागी कविता)

सतीचं मंदिर

क्रांती साडेकर

कितीतरी वर्षांपूर्वी अचानकच एका प्रवासात कुण्या अनोळखी, अज्ञात गावी पडाव टाकावा लागला, तिथे असलेल्या एका गूढ, अंधाऱ्या पडीक मंदिर सदृश वास्तूत एक उन्मनी वसतीला होती. तिच्या उन्मनीपणाचा [जो एरवी त्रासदायक ठरला असता] जराही विचार न करता कुणा वासनांध पशूने तिला कुस्करून तिच्या फाटक्या पदरात आपल्या गलिच्छ वासनेचं फळ टाकलं होतं आणि तिला तिच्या परिस्थितीवर, नियतीवर सोडून दिलं होतं. गावाबद्दल बोलत असता अशी माहिती मिळाली, की ती ज्या मंदिरात वास्तव्यास होती, ते मंदिर अशाच एका उन्मनी स्त्रीचं, जी हिच्याचसारखे दैव घेऊन आलेली आणि गावातील कुणा प्रतिष्ठिताच्या दुष्टाव्याची शिकार झालेली. पण तिचा आवाज त्या धनाढ्य व्यक्तीने कायमचा बंद केलेला आणि अचानक गावावर घोर संकटांची टोळधाड आली. मांत्रिक-तांत्रिक, देवदेवस्की या सगळ्या मार्गांचा अवलंब करूनही ती टळेना, तेव्हा 'त्या' बिचारीचं मंदिर बांधलं, सती म्हणून तिची तिथे स्थापना केली. गावावरची बिलामत टळली. पण सतीचं मंदिर गूढतेच्या घेऱ्यात राहिलं. तिकडे कुणीही फारसं लक्ष दिलं नाही, आणि म्हणून ते भग्नावस्थेत दुर्लक्षित राहिलं. हिला तिथून काढायची हिम्मत कुणी केली नाही, कारण आधीचा एक अनुभव पुरेसा होता...................या विचित्र कहाणीने सुन्न झालेल्या मनात सतीने बीज टाकून दिलं होतं तिच्या दुःखाचं, त्याला अंकुर फुटून हे अशा रूपात उमललं ते.

अक्षर-अंकुर हा एक उत्तम प्रकल्प आहे. याच्या सगळ्याच भागातल्या कविता वेगळ्या विषयांवरच्या, आशयघन आणि वाचनीय आहेत.

सती

सतीचे अर्धभंगले शिल्प, गूढ अंधारव्याप्त गाभारा
अशा त्या भग्न मंदिराच्या भिंती आधार तिच्या संसारा

कुणाच्या पापाच्या वाहते पखाली, कोण, कुठुन ही आली?
कशी ही जितीजागती सती मिरवते कलंक फुटक्या भाळी?

कवळते विटलेल्या लक्तरासारखे जिणे, कशी ही जगते?
खिळवुनी दूर दूर नजरा ती कसली अनुपम स्वप्ने बघते?

तळ्याच्या मळकट पाण्यामधे निरखते धूसर प्रतिबिंबाला
तिच्या निर्माल्यामधल्या फुलासारख्या सुकल्या आयुष्याला

दिशांचे मुक्त घुमट पाखरू मनाचे चीत्कारांनी भरते
कधी ती विकट हासते, भेसुर रडते, निर्विकार कधि उरते!

तिच्या जन्माची जळते धुनी, राख फासून देह बैरागी
जशी उध्वस्त मंदिरी ज्योत मंद काजळी पांघरुन जागी

कुणाचा आणि कधीचा शाप असावा निखळ, नितळ शिल्पाला?
सती त्या छिन्नभिन्न शिल्पामधली ये पुन्हा पुन्हा जन्माला !

krantisadekar@gmail.com

काळोखातला किरण

सृजा

आपल्याच मनाच्या दूर कुठल्यातरी कोपऱ्यात एक खोली अशी असते जिथे आपल्यातल्या सगळ्यांत गडद रंगांना आपण स्थान देतो. आपल्यातल्या सगळ्या उदास भावना एकत्र तिथे ठेवतो..
पण त्यासोबतच ती जागाही आपल्यासाठी काहीतरी खास बनत जाते,, तिथे जमा करून ठेवलेल्या प्रत्येक कणाशी आपलं एक नातं असतं.. एका अगम्य काळाशी जोडणारे दुवे तिथे सापडतात. आणि त्याच छोट्या छोट्या गोष्टी आपल्याला अजाणता, नकळत पुढे जाण्याची प्रेरणा देत असतात. माणूस सतत स्थैर्याकडे वाटचाल करतच राहतो. वाईटातल्या वाईट दिवसांतून सुद्धा पुढे सरकण्याचा प्रयत्नात असतो.

या काहीश्या काळोख्या जागेतून एक प्रकाशाचा किरण यावा तसा विचार येतो.. आणि ही संकल्पाची संकल्पना पुढे आली..

संकल्प ही कविता पण त्याच जिद्दीची कथा आहे जी आपल्यातल्या प्रत्येकात असते. अवघड परिस्थीत सुद्धा सुखाची किनार शोधण्याची जिद्द.

अक्षर अंकुर महोत्सवाने मला माझ्या काळोखातल्या प्रकाशाची नव्याने जाणीव करून दिली.. एक नवा दृष्टिकोन दिला. हा दृष्टिकोन आता सतत माझ्यासोबत राहील

संकल्प

पाऊलवाटेवर निसटून पडलेले
कण काही वेचते आहे
स्वप्नांच्या धाग्यावर निरगाठी
काही उगाच खेचते आहे

तृप्त मनालाही कधीची
हुरहुरशी जरी लागलेली आहे
सांधून ठेवल्या तुकड्यांना तरी
पूर्णता अचानक लाभलेली आहे

हलक्या हाताने टिपत जात
पापणीमागचे दवबिंदू नि वारे
मागच्या मागेच पसरलेले राहिले
मागच्या काळाचे जुने हाकारे

वाळूचं पाऊल टाकते वळीव पावसात
अंकुर-साम्राज्यावर कर्जाऊ घेऊन नशीब
खारट घामेजल्या जमिनीच्या बळावर
उद्यापासून लावणार सुखांचा रतीब

जुन्या हरेक हारेत ओवून
नवे संकल्प अलवार बांधते
पूर्णत्वावरच्या कोरड्या सुरकुत्या
निश्चयाच्या गिलाव्यात सांधते

mesruja@gmail.com

प्रयत्नातले हिरे

अंबरीष देशपांडे

कविता, गीत हे आयुष्याला जडलेले हिरे आहेत. त्यांच्यासोबत आयुष्यही उजळून निघत आहे. आणि मी फक्त त्याचा प्रकाश भोगत आहे, लिहित आहे. मुळात तबलावादक असल्याने पहिली कविता सुचली तेव्हापासून 'लय', 'ताल' या महत्वाच्या बाबी कवितेत सामावत गेल्या. वृत्त, मात्रा याबाबत जरी कच्चा असलो तरी गायकाला नक्की काय गाता येईल याची जाण मात्र आपोआप आली. त्यामुळे कमी लेखन अनुभवातच मला मराठी अल्बम, सिनेमा मध्ये गीतलेखनाची संधी मिळाली.

पण कवितेचे शिक्षण अजून अधुरे आहे. म्हणून अधूनमधून वृत्तांचे प्रयत्न करत राहतो. त्यातीलच हा "शार्दुलविक्रिडीता"चा थोडा हललेला प्रयत्न. कवी आणि गीतकार मध्ये एक अनोखा फरक असा की जे मनाला आवडेल ते लिहितो तो कवी आणि लोकांना आवडेल ते लिहितो तो गीतकार. अस माझ प्रामाणिक मत आहे. यावेळी मी कवी होण्याचा प्रयत्न केला. तुम्हाला तो आवडला यातच सर्व समावल. कारण जसा कलाकाराला प्रेक्षक तसा कवीला वाचक; दोघेही मायबापच!

संकल्प माझा उरे

केला काय गुन्हा, मलाच न कळे, वाटे न सारे खरे
देतो आज पुन्हा कुणास कुठल्या, मुर्खास मी उत्तरे
नाही शुध्द इथे, कुणासही तरी, झालेत सारे कवी
आता बोलु नये, उगाच मी तरी, संकल्प माझा उरे
.
.
जेथे ताल नसे, जीवंतही कसे, होइल ते काव्य रे
ठोके श्वास तुझे, लयीत असणे, आहेच कर्तव्य रे
जेव्हा भाव तुझे, लयीत भीनती, शब्दातुनि दिव्य रे
कोणा सांगु नये, समस्त बहीरे, संकल्प माझा उरे
.
.
लिहले भाव तुझे, धड्यापरी तसे, साहित्य होइल का?
हाती फ़क्त दिवा, तुझ्या म्हणुनि तो, आदित्य होईल का?
दृष्टी काव्य इथे कुणास न दिले, वरदान ते लाभले
इतुके जाणुनही कुणीच न वळे, संकल्प माझा उरे..
.

d.ambarish@gmail.com

काव्यप्रवास

अमोल कुंभार

"आपली कविता सर्वोत्कृष्ट पुस्तकासाठी निवडली गेली आहे"..... इ-मेल वरचा हा मजकूर वाचला आणि यावेळी कोणती भावाना मनात उमटली, हे नक्की सांगता येण्यासाराखं नव्हतं. पण कविता विश्वातला आपला प्रवास... किती... कसा.... आणि केव्हापासून याचा शोध लावन्याचा प्रयत्न सुरू झाला. आता आठवत कविता लिहिली तर जायची पण तिला वाचकच मिळत नसे. याहून ती वाचली न गेल्यामुळे, इरतांचे मत, टिका, सल्ले यासारख्या कविता फुलवनाऱ्या, घडवनाऱ्या गोष्टींपासून मी कितीतरी दूर होतो. हे सुरू असताना या कवितेंच्या प्रवासात दोन साथीदार मिळाले आणि अर्थातच ते म्हणजे "मराठी कविता" आणि "अंकुर अक्षरांचे". कविता खुलणे, फुलणे हे तर झालंच पण कविता उमलली तिही इथेच.

आज इथपर्यंतचा प्रवास पाहता, आठवून जातात ते इथे विसावलेले नवकवी, त्यांच्या कविता, आणि तुम्हा लोकांकडून मिळालेली दाद, प्रोत्साहन,दिलेले सल्ले, केलेल्या टिका. "कवी" या असाधारण व्यक्तीकडे म्हणू किवा या संकल्पनेकडे जो प्रवास सुरू झालेला आहे तिथपर्यंत पोहचू किवा नाही हे माहित नाही. पण या प्रवासाची पाउलवाट निर्माण करून दिली ती"अंकुर अक्षरांचे" नेच. "अक्षर अंकुर" चे आजपर्यतचे सर्वच भाग, त्याचे विषय,निवडलेल्या कविता हे सर्व कौतुकास्पद आहे. हि कवितेची वेल अशीच फुलत जावी, इथे नवनवीन फुल अशीच बहरत जावीत आणि तीच संगोपन अशाचप्रकारे भविष्यात पण केलं जावं हिच प्रार्थना.....

माफीनामा

वागलो त्यांच्याशी मैत्रीने, प्रेमाने, ईमाने
ते म्हणती तू होतास भयाण वादळाप्रमाणे
जरी मी अरोपी त्यांच्या तुरुंगात
मी नव्हतोच वादळ वा वारा तुमच्या अंगणात
आज जितके तुम्ही मज शिव्या शाप दिले
तितक्याच वेळी मी आज स्वत:लाच माफ केले.........

मी गायले एक गाणे जीवनाचे, ऐकली तुम्ही फक्त आरोळी
पोळले माझे हात, मी विझवाया गेलो होतो तुमचीच दहकती होळी
मी सावरलोही स्वत:च, घातली फुंकर हळूवार वेदनांवर
तुम्ही म्हणुनी मजला लाचार, साधले वार माझ्याच जखमांवर
म्हणता मला वणवा जंगलातला, आयुष्य आमचे जळाले
त्याच राखेची घालून रांगोळी, मी आज स्वत:लाचच माफ केले...........

पाहीले जेव्हा तुम्हास एकाकी, मी स्वत:चीच केली गर्दी भोवताली
पाठी ठेवला हात मी स्नेहाने, झालो अडचण, पाप हे कसले भाळी
मारली मी जेव्हा मीठी अलगद, माझ्या हृदयात फुले होती
दचकून मला झिडकारले तेव्हा, ना माझ्या हाती कुठली सुरी होती
मन होते सुगंधी माझे, फुल हृदयातले तुम्हीच कुस्करले
त्याच पाकळ्यांचे बांधून तोरण, मी आज स्वत:लाच माफ केले...........

आता थकलो पुरता लढून, सुकले डोळेही अन आसवे गोठली मनात
ज्यांच्यासाठी हरलो, उरलो,त्यांनीच केला वध या पाप-पुण्याच्या रणात
श्वास हा अखेरचा प्रतिक्षा किती कठोर नि किती भयाण हे हृदयाचे स्पंदन
मागतो क्षमा साऱ्यांची, तुझी त्याची जगण्याची, आता अखेरचे हे वंदन
आस अंतिम क्षणाची, कोरडा सागर मनाचा, श्वास जरी तेव्हा गुदमरले
मी त्याच श्वासांचे वादळ होवून, अखेरीस मी आज स्वत:लाच माफ केले.......

amolskumbhar@gmail.com

ध्यास निर्मितीचा

प्राजक्ता पटवर्धन

दिसा माजी काहीतरी लिहावे.. असं म्हंटलं आहे. या उक्तीप्रमाणे काही न काही लिहित असते मी. फेस बुकवरच्या 'मराठी कविता समूहा' ची मी सदस्य झाले आणि त्यांच्या वेगवेगळ्या उपक्रमात सहभागी होऊ लागले.ही कविता त्यातल्याच एका उपक्रमासाठी लिहिली होती.
'लिहा ओळीवर कविता' या उपक्रमात 'खंत नाही खेद नाही' हि ओळ दिली होती. हि ओळ वापरून अख्खी कविता किंवा गाणे लिहायचे असते.
ओळ वाचल्यावर असं वाटलं कि, खरच माझ्या मनाला जे वाटतंय ते यात लिहिता येईल. कवीला नेहमीच कसलातरी ध्यास असतो. नव निर्मितीचा ! आणि एक कवयित्री म्हणून मला नेहमीच काहीतरी वेगळ्या कल्पना मांडण्याची इच्छा असते.
मी सहसा मुक्त छंदात लिहित नाही. काही खास कारण असं नाही .. पण मला छंद बद्ध कविता, लयदार कविता आवडतात.
त्यामुळे एखादं वृत्त , किंवा ठराविक मात्रा संपूर्ण कवितेमध्ये सांभाळणे मला आवडते.
ही कविता मंजूघोषा या वृत्तामध्ये मी लिहिली.
कवितेचा आशय समजायला सोपा आहे. मला लागलेला ध्यास आणि त्यासाठी मी केलेली माझ्या मनाची तयारी! मार्गामध्ये येणारे काटेकुटे, चढ उतार.. सगळे पार करून ध्येय गाठायचं आहे.
आत्मविश्वासाने भरलेल्या मनाची अवस्था इथे वर्णन करण्याचा प्रयत्न केला आहे.
हि कविता अक्षर अंकुर साठी निवडली गेली त्याचा आनंद तर झालाच पण एखाद्या निराश, उदास मनाला जर हि कविता वाचून थोडीशी जरी उभारी आली, आशा वाटली तर या कवितेचे यश समजेन मी.

ध्यास आहे

खंत नाही खेद नाही, एक वेडी आस आहे
त्या नभाला जिंकण्याचा आज मजला ध्यास अहे

ना कुणीही सोबतीला, ना कुणी मागे पुढेही
मीच वेचावी फ़ुले अन मीच वेचावे खडेही
साथ ही काट्याकुट्यांची भासते मज खास आहे

चहु दिशांनी हात देता मी निघावे त्या प्रवासा
कोवळ्या किरणांतुनी त्या भास्कराचाही दिलासा
जाणते मी हा जरासा वेगळा हव्यास आहे

पर्वतांना ठोकरावे वाहुनी वाऱ्यासवे मी
रात उजळावी जराशी चमकुनी ताऱ्यासवे मी
विश्व सारे वर्तुळाचे, मी तयाचा व्यास आहे

मागणे माझे न काही! ईश्वराला त्या स्मरुनी
हात व्हावे हे पुढे 'देण्या'स केवळ भरभरुनी
शिल्पकारा मीच माझ्या जीवनी विश्वास आहे

praaju.patwardhan@gmail.com

अक्षरांचा वटवृक्ष

मनिषा नाईक (माऊ)

अंकुर म्हणजे मुळात नव-निर्मिती.. मृगाची पहिली सर् पडावी आणि आतुर धरणीच्या कुशीत बीज अंकुरावे... हेच अंकुरणारे नवे बीज उद्याचा मोठा 'वटवृक्ष' ही होवू शकतो. बीजाचा वृक्ष होण्यापर्यंतच्या प्रवासातील अंकुरणे हे पहिले पाऊल आहे... तसेच " अक्षर अंकुर " सारखे काही नवे उपक्रम ई-साहित्य चळवळीस नवे अलंकार चढवतील यात शंका नाही. आपल्याच परिवारात चैतन्य आणि उत्साह कायम रहावा यासाठी वेळोवेळी उत्सव होणे गरजेचे असते. जेणेकरून या समारंभाच्या निमित्ताने सगळे एकत्र येतील आणि आनंद व्यक्त करतील. विचारांची देवाण घेवाण होईल. ”मराठी कविता” तर्फे घेण्यात आलेल्या "अक्षर अंकुर" या स्पर्धेच्या
निमित्ताने असाच उत्सव पहायला मिळाला.

मला या उपक्रमात सहभागी करून घेतले आणि मनोगत व्यक्त करण्याची संधी दिली त्याबाद्दल ई-साहित्य प्रतिष्ठानच्या संपूर्ण टीमची मी आभारी आहे. या उपक्रमाची जबाबदारी संहिता सारख्या गुणी कवयित्रीने हाती घेतली आणि आतिशय यशस्वी पार पाडली याबद्दल तिचे अभिनंदन. तसेच रंजनताईने देखिल या महोत्सवाचे उत्कृष्ट रसग्रहण केले आहे प्रथमपासुनच या उपक्रमा बाबत मनापासून उत्सुकता होती...त्यात स्पर्धेसाठी देण्यात आलेले विषय जरा हटके असल्यामुळे, या विषयी काय वाचायला मिळणार याबाबत उत्सुकता होती....पाहिले भाग अपेक्षे प्रमाणेच सुंदर होते...यात अनेक नव कवींच्या कविता वाचायला मिळाल्या , मुखपृष्ठ ही समर्पक वाटले. आणि आता हा भाग देखिल पाहण्याची आतुरता वाढली आहे

या उपक्रमात निवडण्यात आलेली "वळण वाटेला " ही माझी कविता ... या कवितेत स्त्री जीवनाची व्यथा मांडण्याचा छोटासा प्रयत्न केला आहे.

काळ बदलत चाललंय .... विविध क्षेत्रात प्रगतीचे नवे नवे टप्पे गाठत आपण पुढे चाललो आहोत. आपल्या भोवती असलेलं वातावरण खूप सुरक्षित आहे... परंतु काही ठिकाणी या ही पलीकडचं आयुष्य आहे .. ग्रामीण भागात अजूनही आपल्याच काही भगिनींचे जीवन दुर्लक्षित आहे. ...त्यांच्या प्रगतीच्या मार्गात अनेक अडथळे अजूनही आहेत , या सगळ्यावर मात करून जीवनाशी त्यांचा अखंड संघर्ष चालू आहे...अशाच जीवनाची व्यथा या कवितेत मांडण्याचा प्रयत्न केला गेला आहे. यातली वेदना प्रत्येकीची आहे ...पर्यायाने ती माझीच आहे...!

शब्द खूप बोलके असतात असे म्हणतात. "जे काम तलवार करू शकत नाही, ते एक लेखणी करू शकते " असे देखिल म्हंटले जाते. ओठावर आलेले शब्द कधी घात ही करू शकतात तर कधी हेच शब्द नवी निर्मिती देखील करू शकतात , म्हणजे इतिहास घडवणारे आणि नवा इतिहास रचणारे शब्दच असतात. आपण सर्व साहित्य यात्री आहोत आणि शब्दांचे पुजारी , अक्षरांचे दास आहोत. इथे या शब्दोत्सवाच्या निमित्ताने सगळे एकत्र आलो आणि एकमेकांच्या रंगात मनसोक्त रंगलो. हा "अक्षर -अंकुर" उपक्रम चैत्र पालवी ठरावा आणि पुढे

पुढे अशा प्रकारचे अनेक बहर या साहित्य रुपी अंगणी येवोत हीच शुभ कामना....!

वळण वाटेला

कसा वळण वाटेला व्यथा वेदनेचा गाव
तिथे मायेच्या झऱ्याचा आहे अजून अभाव

रोज चालता चालता कशा काळजाला झळा
किती दाबले हुंदके येती आतुनच कळा

कसा सरळ वाटेला फुटे मधून हा फाटा
आता प्रवास लांबचा त्यात वाटेवरी काटा

नको थांबू आडोशाला नाही कोणाचा भरोसा
कुठे आधार मागावा दिला दैवाने ही ठोसा

मुक्कामाला जाता जाता उगा लांबला प्रवास
प्राण कंठाशी दाटला आता थांबेल हा श्वास

धुके दाटले मनात अंधारल्या साऱ्या दिशा
आज भाबड्या 'मनी'च्या साऱ्या संपल्या आशा

nmani15@gmail.com

अभिव्यक्तीची ओढ

सुनीता पिंप्रीकर

प्रिय ई-साहित्य टीम,मनःपूर्वक आभार!

येणारा प्रत्येक अनुभव समरसून जगण्याच्या वृत्तीतून आलेली अभिव्यक्तीची ओढ... अन त्यातूनच उमललेली माझी कविता. खरं तर कधीच कोणालाही न दाखवलेली .कवितांची वही तुमच्यापुढे उघडावीशी वाटली ती केवळ हीच संवेदना सर्व कवी मित्र-मैत्रिणींच्या लेखनात ही जाणवली म्हणून. कुठल्याही साहित्यिक मोजपट्ट्या नसलेला, कविपणाचा अभिनिवेश नसलेला, सहज शेअरिंग होईल असा हा कट्टा मनापासून आवडला. आणि कविता पाठवली. तुम्ही ती प्रसिध्द केलीत तेंव्हा वर्गात एका कोपऱ्यात बसलेलं पोर अचानक मेरीट मध्ये झळकाव अन मग झालेल्या कौतूकान बावरून जावं तसंच काहीसं वाटलं स्क्रीनवर झळकलेली माझी कविता बघताना!

पुनः एकदा आभार!

अडगळ

नव्या वर्षाची नवी डायरी
पानं सगळी करकरीत कोरी

वर्ष नवे संकल्प नवे
विचार नवे काव्य नवे
लिहू म्हटलं त्यावर काही
जे सगळ्यांना हवे हवे

जापनीज मनेजमेंट मधले
५ एस होते कुठेतरी डोक्यात
म्हणून पहिल्याच पानावर अक्षर लिहिले
" अडगळ"
अन क्षणभर त्याकडे बघत राहिले.
शब्द तसा काना,मात्रा आणि वेलांटीही नसलेला
पण अर्थ-चित्र-आठवणींनी फेर धरलेला.

शब्दकोशात अर्थ साधा सोपा.
नको असलेले, जागा अडवून बसलेले
कालबाह्य, उपयोग मूल्य नसलेले
असं बरंच काही....

डोळ्यांसमोरचे चित्र मात्र भारीच सुंदर
आजोळच्या घरातली ती अडगळीची खोली.
तिथला तो धुळकट गंध
उन्हाच्या कवडशात चमकणारी कोळीष्टक.

तिथ सापडलेली रिबीन आणि आकडा
फुटलेली पाटी अन पेन्सिलचा अर्धा तुकडा.
एकेक वस्तूच्या शंभर आठवणी
शाळेतले दिवस, अभ्यास आणि मैत्रिणी.

क्लासमध्ये शिक्षक जेंव्हा शिकवत होते
जापनीज मनेजमेंट मधले 5 एस टेक्निक
'सेईरी' म्हणजे अडगळ आधी फेकून द्या
पुन्हा पुन्हा म्हणत होते.

म्हटलं मनाशी खरंच एकदा
काढून टाकू सगळीच अडगळ.

मनाला काजळी आणणारी
स्वार्थी, निराशावादी विचारांची अडगळ

समाजातील भ्रष्टाचार, जातीयवाद,
अन दहशतवादाची अडगळ.

पैशाच्या लोभापायी नातं विसरणारी
घोटाळे घडवणारी आर्थिक अडगळ.

माणुसकीला काळिमा फासणारी
सामाजिक अडगळ.

वरवर पाहता सर्व स्वच्छ झाले
अडगळीचे ढीग मात्र तसेच राहिले
कारण फेकून दिलेल्या अडगळीचे काय करायचे
हे मात्र शिक्षकांनी नव्हते शिकवले.

तेवढ्यात एक कल्पना सुचली.
" अडगळ" मधला 'अ' पुसला
क्षणात कॅनव्हास मोठा झाला.
मग आपुलकीचा गळ टाकून
उरलेला गड जिंकला.

मनाच्या आभाळात आता सगळे
कसे निर्मळ आणि नितळ.
अगदी जसा आजोळच्या घरात
झिरपणारया कवडश्यातला सूर्यकिरण!

sunita.pimprikar@gmail.com

माझेच गीत

मुकुंद कर्णिक

या कवितेमागची भूमिका अशी की कवी त्याच्या एकतर्फी आणि असफल प्रेमाच्या आठवणीत जीवन कंठतो आहे. तो आणि त्याची ती प्रियतमा दोघांच्याही आयुष्यातला प्राईम टाईम आता ओसरला आहे आणि आज अचानक ते दोघे समोरासमोर येतात. या कवितेच्या माध्यमातून कवी ते प्रेम आणि त्या प्रेमाच्या असफलतेतून बसलेल्या धक्क्याने झालेला भ्रमनिरास व्यक्त करताना तिला सांगतो आहे की झाले गेले भूतकाळ होता म्हणून विसरून जायचे असले तरीही तेव्हाच्या त्या हळव्या क्षणातला मी सहन केलेला तो धक्का, माझ्या जिवाची झालेली ती घालमेल, जी तुला तेव्हा जाणवली नव्हती ती, आज या कवितेत मी ओतलेली आहे. हे माझे आजवर जपलेले गुपित म्हणजे ही कविता - हे माझेच गीत आहे !

कविता लिहिताना सुरुवातीला का कोणास ठाऊक मला ती गद्यकाव्य किंवा मुक्तछंदात लिहावी असे वाटत होते. पण नंतर प्रकर्षाने वाटायला लागले की तिला लय आणि गेयतेची जोड द्यायलाच हवी. त्यातही गजलेचा पेहराव तिला जास्त चांगला होईल. आणि म्हणून मग कवितेचे अंतिम रूप हे असे झाले. रसिकांना आवडेल अशी आशा आहे.

हे झाले या माझ्या कवितेबद्दल. आता 'मराठी कविता' या संबंधाने थोडेसे लिहायचे आहे. माझी (पूर्णपणे वैयक्तिक) धारणा अशी आहे की मराठी कविता ही पद्य स्वरुपातच जास्त खुलते. लयबद्धता, गेयता हे कवितेचे अधिकार आहेत आणि ते तिला मिळावेतच. यमक, यति, वृत्त, छंद, मात्रांची आभरणे, आभूषणे न दिलेल्या पण तरीही भावपूर्ण, अर्थपूर्ण असलेल्या रचनेत काव्य असते पण तिला कविता म्हणणे मला जरा कठीणच जाते. दुर्दैवाने मराठी कवितेच्या या अंगाकडे आज कवींचे दुर्लक्ष होत आहे असे खेदाने म्हणावेसे आणि त्यांना सांगावेसे वाटते की,

"मनी भावना जशा उपजती तशा लेखणीतून प्रसविता;
कविवर, थोडे मर्म सांगतो कशी उमलते सुरेख कविता.

जलधारा बरसतात तेव्हा ओहळ अस्ताव्यस्त वाहतो;
बांधिव पात्रातून वाहतो तेव्हा होते सुंदर सरिता.
वा, वस्त्राचा अखंड तागा ना ये पांघरता अंगावर;
वसन बने तो अंगांगाच्या मापावरुनी कापुनि शिवता.

तसा भावनास्त्रोत झरे परि, काव्य जरी ते, नाही कविता;
कवितेसाठी अनिवार्य असे त्या स्त्रोताच्या सवे गेयता.
लेखणीतला शब्दफुलोरा जिव्हेवर फिरफिरुनि घोळवा,
झिलई लयीची मिळेल जर त्या तरीच त्यासी संज्ञा कविता.

मात्रांचा पण छंद न धरिता, लघु, गुरु, गण अन अक्षरवृत्ता -
विसरला तरी नसे खेद; जर लिहिलेल्याला लय, सुरेलता.
यति-यमकाची जोड असे जर रति-मदनाच्या जोडिसारखी;
तरीच, कविवर, शब्दफुलोरा बनेल तुमचा सुरेख कविता."

अक्षर अंकुर नवनवीन कवींना एक व्यासपीठ निर्माण करून देत आहे. या स्तुत्य उपक्रमाचा त्या कवींना आणि पर्यायाने मराठी कवितेला लाभच होणार आहे. अक्षर अंकुरचे त्याबद्दल मन:पूर्वक अभिनंदन आणि आभारही.

आता अतीत आहे

सांगायला हवे का माझेच गीत आहे?
शब्दात ओतले ते माझे गुपीत आहे

हळव्या क्षणांमधे मी जे सोशिले मनाने
ते श्राव्य-शब्द रूपामध्ये प्रतीत आहे

ठावे तुलाहि तेव्हा मी जीव जडवलेला
मानून की तुझीही मजवरच प्रीत आहे

चुकले कळून जेव्हा ना पाहिलेस वळुनी
रंभा मदालसांची ऐसीच रीत आहे

धक्का असा मिळाला की सैरभैर झालो
मेटाकुटी मनाला मी सावरीत आहे

अजुनी स्मरून प्रीती त्या भाबड्या मनाची
आयुष्य आजही मी करतो व्यतीत आहे

शब्दांतुनी कळावे मी काय भोगले ते
म्हणशील तू जरी तो आता अतीत आहे

karnik.mukund@gmail.com

किंचित कवी

मनीषा भिडे

कविता हा एक अतिशय संवेदनाशील साहित्यप्रकार आहे. त्यात अगदी थोडक्या शब्दात खूप मोठा आशय व्यक्त करता येतो. काहीवेळा कवीला अभिप्रेत असणारा अर्थ आणि वाचकापर्यंत पोहचलेला अर्थ हे वेगवेगळे असू शकतात. पण तरीही कविता सर्वांनाच भुरळ घालते. कविता न आवडणारी व्यक्ती लाखात एखादीच असेल.

मराठी भाषेला काव्याची समृद्ध परंपरा लाभली आहे. अनेक दिग्गज कवी/कवयित्री आपल्या मराठी भाषेमधे होते.. आहेत आणि असतीलही. आणि त्यामुळेच या यंत्र युगात वावरताना एरवी काहीसे नीरस असलेले आयुष्य, सुरस झाले आहे. प्रत्येक जण कधी ना कधी, आयुष्याच्या कुठल्या ना कुठल्या वळणावर 'किंचीत कवी'झालेला असतोच.

अक्षर-अंकुर च्या पाचव्या भागात माझी "एकरूप" ही कविता आहे. पंढरपुरचा विठोबा हा साऱ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत. विठ्ठल आणि त्याचे भक्त यांच्यामधे एक विलक्षण असे अद्वैत दिसते. याच्या दर्शनार्थ हजारो भाविक पायी चालत, विठुनामाचा गजर करित पंढरीस येतात. आणि हा देव सुद्धा नुसता गाभाऱ्यात न राहता त्यांना भेटण्यासाठी वाळवंटी येतो, आपल्या भक्तांवर मायेची पाखर घालतो. त्याच्यासमोर सारे भेद लयाला जातात. उच्च-नीच, गरीब-श्रीमंत सारे या सगुणसाकार भगवंताशी एकरूप होतात. या कवितेद्वारे, मी वारकऱ्यांचे त्यांच्या दैवताशी असलेले हे अनोखे नाते व्यक्त करण्याचा प्रयास केला आहे.

मी लिहीलेल्या कवितांना अक्षर- अंकुर मधे समाविष्ट केल्याबद्दल ई-साहित्य प्रकाशन चे मनःपूर्वक आभार! त्यांच्या या उपक्रमाद्वारे अनेक नविन आणि दर्जेदार कविता येथे वाचायला मिळाल्या. त्यांची इ-पुस्तकांची संकल्पना देखिल चांगली आहे.
अनेक लेखक/लेखिका, कवी/कवयित्री लिहित असतात, पण त्यांचे लेखन पुस्तक रूपात अथवा नियतकालिकांमधून कधी प्रसिद्ध होत नाही. अनेक वेळा त्यांनी निर्मिलेले साहित्य उत्तम आणि दर्जेदार असूनही ते त्यांच्या पुरतेच मर्यादित रहाते. याचे कारण आर्थिक आणि व्यवहारिक असते. बऱ्याच वेळा आपले साहित्य कसे आणि कुठे प्रकाशित करता येऊ शकेल याची काहीच माहिती उपलब्ध नसते. आणि ती माहिती असली तरी आपल्या रोजच्या व्यस्त वेळापत्रकातून वेळ काढून ते प्रकाशित करणे शक्य होतेच असे नाही. ई-साहित्य च्या या उपक्रमामुळे हेच साहित्य सहजपणे अनेक रसिक वाचकांपर्यंत नियमीत पोहचत आहे. आपण लिहिलेले वाचले जाते आहे आणि त्यावर प्रतिक्रिया (चांगल्या/वाईट) दिल्या जातात, ही प्रक्रिया खरोखरच खूप आनंद देणारी आहे.

मराठी भाषेतील उत्तमोत्तम साहित्यकृती आपल्या माध्यमातून जास्तीतजास्त वाचकांना वाचनार्थ उपलब्ध होवोत हीच शुभेच्छा!

एकरूप

चंद्रभागेच्या तीरी .. भगतांची मांदियाळी
टाळ चिपळ्यांची खेळी .. गर्जे सांज अन सकाळी ||

नाचे किर्तनाच्या रंगी .. भक्तिरस अंगोपांगी
हर्ष दाटे अंतरंगी .. गुण विठ्ठलाचे सांगी ||

हरिनामाचा गजर .. हृदयी हरीचा वावर
पाकळी पाकळी अंतर .. गंध भरे निरंतर ||

ओढ पावलासी लागे .. नाम जप मुखी रंगे
सावळ्याच्या दर्शना गे .. संत पुढे , जन मागे ||

शोभे तुळशीमाळ गळा .. माथी चंदनाचा टिळा
विठू साक्षात सावळा .. माया त्याची जनसकळा ||

दिंडी भक्तांची ही चाले .. ध्वजा भक्तीचीच डोले
वाळवंटी जन आले .. श्वास, श्वास विठ्ठल झाले ||

जनभक्तीचा सागर .. विठूनामाचा जागर
भक्तीचाच गहिवर .. भारलेले चराचर ||

झाले कैसे अपरूप .. सावळे सगुण स्वरूप
पाहूनीया हे आरूप .. सान थोर एकरूप ||

manishasni@gmail.com

कविता आपली

रुपेश सावंत

"अक्षर अंकुर" खूप खूप धन्यवाद !

मी रुपेश दिलीप सावंत, मेकॅनिकॅल इंजिनियर असून सध्या एका खाजगी कंपनीत नोकरी करत आहे.
खरंतर मी आणि कविता हे नातं कधी जुळलं कळलच नाही, शाळेत असताना लागलेलं हे वेड अजूनही तसंच आहे.
शाळेत असताना दरवर्षी प्रकाशित होणारया मासिकात आपली कविता छापून यावी आणि ती आजही तशीच छापून यावी हे वेड देखील तसच आहे.
फरक आहे तो फक्त माध्यमांचा.
आपल्या आजूबाजूस खूप काही घडत राहत. आपण
ते सार अनुभवत असतो. आपण बरयाच गोष्टी वाचतो, संवाद साधतो.
मग आपल्याला काहीतरी सुचतं आणि
सुचत राहतं. ते कागदावर उतरतं आणि त्याची कविता होते.
ती पुन्हा इतरांना कळावी, त्यांना ती
आपली वाटावी, आवडावी, याची धडपड सुरु होते.
या प्रत्येक टप्प्यात आपल्यातला कवी प्रगल्भ होत असतो, काहीतरी चांगल लिहिण्याची उमेद उराशी बाळगून.
तो कधी काय लिहील हे त्यालाही माहित नसतं त्याच्या वहीची पाने अशाच कितीतरी अपूर्ण ओळींनी भरतात. कधी पूर्ण होतात ?

अशाच काही ओळी पूर्ण झाल्या आणि त्या अक्षर अंकुर या उपक्रमात प्रकाशित होत आहेत याचा खूप आनंद होत आहे.
'मराठी कविता' समूहातर्फे सुरु असलेल्या या आणि
अशाच अनेक उपक्रमांना खूप शुभेच्छा !

एक अजुन रात्र सरली

ओसरीचे दिवे माळवायला ती आली
दूरवर अंधारात नजर टाकत राहिली
कुठूनतरी दिसेल मिणमिणता उजेड
ओठात पुटपुटत मग तिथेच थांबली

अवसेची रात्र काळोख मिट्ट होता
रातकिड्यांच्या साथीला पाऊस घट्ट होता
आज येणार नक्की त्याने कळविले होते
थकल्या डोळयांना, हाच एक आधार होता

थरथरत्या हातांनी ती गजांना धरायची
लटलटत्या पायांना खोटं बळ द्यायची
अर्धी पांढरी नजर तिची शोधायची त्याला
कधी आठवांत, कधी फोटोवर थांबायची

ती उभी तशीच कितीवेळ भिंतीला रेलून
पदराचं एक टोक तोंडावर धरून
पाऊसही बाहेर बेभान बरसणारा
डोळ्यांच्या कडांत परि राहिलेला दाटून

विरळ विरळ शेवटी मग रात्र होत गेली
काळोखाच्या मागे मग पहाट हसत आली
निजेने जरी हळूच ताबा घेतलेला
वाटेवर त्याच्या ती अजून थांबलेली

आजही शेवटी तो आलाच नाही
'अडकला असेल कुठे' ती मनाशीच म्हणाली
वर्षानुवर्षे ही अशीच रात्र सरते

rupesh_mech473@yahoo.co.in

इथे रोज घडे आमच्या मरणाचा सोहळा

कसा सांगू कसा सोसावा, दुष्काळांचा उभा उन्हाळा
कसा सांगू कसा सरावा महापुरांचा निर्दय पावसाळा
किड्या-मुंगीचं जगणं आमचं कसंही मारा कितीही वेळा
इथे रोज घडे आमच्या- आमच्या मरणाचा सोहळा

सर झडे घामाची पाऊस तरी येईना
भेगाळल्या भुईची या तहान परी भागेना
भूक मारी पोट अन पीळ आतड्याचा सुटेना
बाया पोरांच्या पायी हे आयुष्यही संपवेना
विस्कटला संसार सारा आयुष्याचा चोळा मोळा

बाळगला उरी अंधार आता प्रकाश काही दिसेना
उजाडावी कशी पहाट काळी रात सरेना
करपल्या पायांचा मग जाळ काही सुटेना
अंग जाळी दिस अन राती झोप येईना
कधी चिंता मिटून साऱ्या लागणार सुखाने हा डोळा

जगणं झालं महाग तरी मरण देव देईना
भिकार उपेक्षित लेकराची परी, दया त्याला येईना
तिरडी झाली लाचार अन खांदा कुणी देईना
अखेरच्या वाटेवरही कुणी साथ द्याया उरेना
जितेपणीच लचके तोडाया बघ गिधाडं झाली गोळा
इथे रोज घडे आमच्या- आमच्या मरणाचा सोहळा

rupesh_mech473@yahoo.co.in

बारा लाख वाचकांसाठी ई चळवळ

तीन वर्षापूर्वी स्थापन झालेल्या ई साहित्य प्रतिष्ठानने आजवर आपल्या वाचकांना दिडशेहन अधिक पुस्तके विनामुल्य दिली. मोरया, मीरा, कृष्ण, गुरूदेव रविंद्रनाथ, स्वामी विवेकानंद, विंदा करंदीकर, ना. धो. महानोर, ग्रेस, नारायण सुर्वे, लोकमान्य टिळक, छत्रपती शिवाजी महाराज असे एकाहून एक सरस विषय आम्ही घेतले. सुमारे ४०० नविन साहित्यिकांना लोकांसमोर आणले. इंटरनेट्वर मराठी भाषेतील साहित्य लोकप्रिय करण्याची चळवळ हिरीरीने पुढे नेली.

प्रेम आणि सौंदर्याबरोबरच आत्महत्या आणि दहशतवाद अशा विषयांवरच साहित्य मांडल. विनोदाला वाहिलेलं ई-श्टाप देऊन हसवलं. लहान मुलांसाठी बालनेटाक्षरीची निर्मिती केली. शास्त्रीय संगीतासाठी संगीत कानसेनचे वर्ग चालवले.

नव्या कवींसाठी एक भक्कम व्यासपीठ म्हणजे नेटाक्षरी चालवले. तर महाराष्ट्रातील किल्यांची माहिती देणा-या पुस्तिका "दुर्ग दुर्गट भारी" द्वारे महाराष्ट्रातल्याच नव्हे तर जगातल्या मराठी मंडळींना उभारी दिली. लाखभर रसिकांपर्यंत दर्जेदार साहित्य नियमितपणे विनामुल्य पोचवण्याची आमची परंपराआम्ही अधिक जोमाने चालू ठेवूच. आम्हाला हा उत्साह आणि प्रेरणा देणारी आपली पत्रेही येत राहूदे.

पण मनात एक विचार येतो. आपली वाचकसंख्या फक्त लाखभर लोकांपर्यंतच मर्यादित का? १२ कोटी मराठी माणसांपैकी निदान १२ लाख वाचकांपर्यंत तरी हे विनामूल्य साहित्य पोचलचं पाहिजे असं नाही वाटत आपल्याला? आणि त्यासाठी काही फार करायची गरज नाही. आपल्या ओळखीच्या १२ लोकांची, १२ मराठी लोकांची ईमेल आयडी द्याल?? जास्त दिलीत तरी हरकत नाही पण निदान १२ लोकांची ईमेल आयडी पाठवा. एक लाख लोकांनी जर प्रत्येकी १२ आयडी पाठवले तर लाखाचे १२ लाख व्हायला कितीसा वेळ लागणार? बारा लोकांची मेल आयडी पाठवणा-या वाचकांना आम्ही ई साहित्य प्रतिष्ठानचे पाठीराखे म्हणून मानाचे स्थान देऊ. तुम्हाला आमच्या पुढील प्रवासाची कल्पना देत राहू. तुमच्या सुचना मागवत राहू. मार्गदर्शन घेत राहू. आमच्या पुढील प्रवासाचे तुम्ही सहप्रवासी असाल.

तर होणार ना ई-साहित्य प्रतिष्ठानचे पाठीराखे ??

फक्त आपल्या खास मराठी मित्र, नातेवाईकांच्या १२ मेल आयडी खालील पत्त्यावर पाठवा.

esahity@gmail.com
akshar.ankurmk@gmail.com

:अधिक माहितीसाठी :
संकेत स्थळ

www.esahity.com

फेसबुक

https://www.facebook.com/esahity
http://www.facebook.com/groups/kavya.marathi